MHKO030113162022

दाखल दिनांक - १६/१२/२०२२.

नोंदणी दिनांक - १६/१२/२०२२.

निकाल दिनांक - ०५/०५/२०२६.

कालावधी - वर्षे महिना दिवस.

**०३ ०४ १८.**

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१४ कोल्हापूर यांचे न्यायालयात

**( पिठासीन अधिकारी: श्रीमती शिल्पा वि. कुलकर्णी ),**

**सं.फौ.ख.क्र.७३१२/२०२२.** **निशाणी क्रमांक १५ /ब.**

**गु.र.क्र.७२७/२०२२.**

**दोषारोप –** भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मो.वा. का.कलम १८४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापुर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | | श्री.एस.जे.सरनोबत. |
| **आरोपी** | | **प्रकाश रंगराव लोहार,**<br>व.व.५७, धंदा -<br>रा.टोप, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री.पी.एस.दाभोळे. |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | :- | १३/०९/२०२२. |
| गुन्हा नोंद झाल्याचा दिनांक | :- | १३/०९/२०२२. |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | :- | १६/१२/२०२२. |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २३/१०/२०२३. |
| साक्षी पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १०/०६/२०२४. |
| साक्षी पुरावा बंद केल्याचा दिनांक | :- | २३/०४/२०२६. |
| निकाल देण्यासाठीचा दिनांक | :- | ०५/०५/२०२६. |
| निकाल दिनांक | :- | ०५/०५/२०२६. |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | :- | निरंक. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्या -बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश लोहार | ४१-अ प्रमाणे नोटीस | - | भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदारांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१. | अमिना शकील मुजावर | फिर्यादी | ०८ |
| ०२. | आरिफ शकील मुजावर | साक्षीदार | १० |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | ०९ | फिर्याद |
| ०२. | १४ | आरोपीचे भा.ना.सु.सं.कलम ३५१ प्रमाणे निवेदन. |

# न्या य नि र्ण य

**( पारित दि.०५ मे, २०२६ रोजी.)**

आरोपीविरुध्द भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मो. वा.का. कलम १८४ अन्वये अपराध ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की -**

**०२.** दि.१३/०९/२०२२ रोजी ०४.१५ वा.च्या सुमारास सी.बी.एस.कोल्हापूर जवळील राजीव गांधी पुतळयाचे लगत असलेल्या हॉटेल नित्यानंद कोल्हापूर समोरील रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी.बस क्र.एम.एच.०६ एस.८९१६ ही हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवली व शकील बकश मुजावर यांना धडक दिली. ते एस.टी.बसच्या चालकाच्या पाठीमागील चाकाच्या खाली सापडल्यामुळे त्यांच्या डाव्या पायास गंभीर दुखापत झाली म्हणुन त्यांना उपचारासाठी दाखल केले असता ते मयत झाले. म्हणुन शाहुपुरी पो.ठा. येथे फिर्याद दिली. त्यानंतर प्रथम खबर अहवाल नोंदविला. प्रथम खबर अहवाल नोंदविल्यानंतर गु.र.क्र.७२७/२०२२ दाखल करण्यात आला. त्याचा तपास तपासणी अधिकारी महिला पो.उ.नि.श्रीमती श्वेता पाटील यांच्याकडे सुपुर्त करण्यात आला. त्यांनी गुन्हयाची सखोल चौकशी केली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, अपघातस्थळाचा पंचनामा केला, वैद्यकिय दाखला, पोस्ट मार्टम रिपोर्ट कामात सामिल केले व तपासकाम पूर्ण करून तपासाअंती आरोपीविरुध्द उपरोक्त कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपी न्यायालयात हजर राहिल्यानंतर आरोपीवर भा.दं.वि.सं.कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का.कलम १८४ अन्वये दोषारोप नि.क्र.०७ ला निश्चित करण्यात आले. आरोपीला गुन्हा कबूल नसलेने व त्याने संपरिक्षेस सामोरे जाणेस तयार असल्याचे सांगितल्याने आरोपीविरुध्द संपरीक्षा चालविण्यात आली.

आरोपीचे भा.ना.सु.सं.कलम ३५१ प्रमाणे निवेदन नि.क्र.१४ लगत नोंदविण्यात आले.

**०४.** अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व बचावपक्षाचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे माझ्या विचाराधीन असून कारणमिमांसासह मी त्यावर माझे निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दि.१३/०९/२०२२ रोजी ०४.१५ वा.च्या सुमारास सी.बी.एस.कोल्हापूर जवळ राजीव गांधी पुतळयाचे लगत असलेल्या हॉटेल नित्यानंद कोल्हापूर समोरील रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील एस. टी.बस क्र.एम.एच.०६ एस.८९१६ ही सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवीत धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तिस दुखापत अगर नुकसान पोहोचेल असा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवली व शकील बकश मुजावर यांच्या सदोष मनुष्यवधाच्या संज्ञेत न मोडणा-या मृत्युस कारणीभूत ठरले ? | **नाही.** |
| **०२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवीत धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तीस दुखापत अगर नुकसान पोहचेल असा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली ? | **नाही.** |
| **०३.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | हयगयीने, अविचाराने चालवून शकील बकश मुजावर यांच्या किरकोळ दुखापतीस कारणीभुत झाला ? | |
| **०४.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हयगयीने, अविचाराने चालवून शकील बकश मुजावर यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला ? | **नाही.** |
| **०५.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे चालविले व जी काळजी घेणे अभिप्रेत होती ती घेतली नाही ? | **नाही.** |
| **०६.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.०१ ते ०६ करीता :-**

**०५.** मुद्दा क्र.०१ ते ०५ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता प्रस्तुतचे मुद्दे हे एकत्रीतरित्या विचारात घेण्यात येत आहे. आरोपीविरुध्द असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

साक्षीदार क्र.०१ अमिना शकील मुजावर (फिर्यादी) यांच्या साक्षीत असे आले की, सन २०२२ मध्ये स.१२.०० वाजता नेहमीप्रमाणे ते भाजी विक्री करण्यासाठी गेल्या होत्या. मेहबुब चिक्कोडी यांचा त्यांना फोन आला की, ‘मुलगा आरिफ याला घेऊन सी.पी.आर. हॉस्पीटल येथे या’. त्या सी.पी.आर. येथे गेल्या-नंतर डॉक्टरांनी त्यांच्या पतीचा मृत्यु झाल्याचे सांगितले. मेहबुब यांच्याकडुन त्यांना कळाले की, एस.टी.बस रिव्हर्स घेताना दोन वेळा त्यांच्या पतींच्या पायावरुन चाक

गेल्यामुळे त्यांचा मृत्यु झाला. सदरचा अपघात राजीव गांधी पुतळा, एस.टी.स्टॅन्ड जवळ चौकामध्ये झाला होता. पोलीस ठाण्यातुन आरोपीचे नाव प्रकाश लोहार असे सांगितले. त्यांनी आरोपीला पोलीस ठाण्यात पाहिले. आरोपीविरुध्द तक्रार (नि.क्र. ०९) दिली. दि.१३ सप्टेंबर, २०२२ रोजी अपघात झाला होता. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतात.

**०६.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, अपघात त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. एस. टी.स्टॅण्डचा रस्ता हा रहदारीचा आहे. अपघातस्थळी त्या गेलेल्या नाहीत. एस.टी. स्टॅण्डच्या रस्त्यावर दुभाजक आहे. अपघात चौकामध्ये झालेला आहे. चौकामध्ये येणारी एस.टी. यु-टर्न घेऊन एस.टी.स्टॅण्डला जाते. एस.टी.स्टॅण्ड रस्त्याच्या दोन्ही बाजूस दुकाने आहेत. आरोपीचे नाव त्यांना पोलीसांकडुन समजले. एस.टी. स्टॅण्ड - कडून त्यांच्या घरी येण्यासाठी रस्ता ओलांडून विरुध्द बाजुस यावे लागते. अपघाता - वेळी त्यांचे पती घरी येत होते. त्यांच्या पतीचा अपघात हा एस.टी.च्या मागील चाकामुळे झाला आहे. अपघात नुकसान भरपाई त्यांना मिळावी अशी त्यांची इच्छा आहे. पोलीसांनी त्यांना फिर्याद दाखल केल्याशिवाय नुकसान भरपाई मिळत नाही असे सांगितले होते म्हणुन त्यांनी फिर्याद दाखल केली आहे.

**०७.** साक्षीदार क्र.०२ आरिफ मुजावर यांच्या साक्षीत असे आले की, दि.१३/०९/२०२२ रोजी ते रंकाळा स्टॅण्डवर असताना सायं.०५.०० वा.त्यांना त्यांच्या बहिणीचा फोन आला व सांगितले की, ‘नित्यानंद सी.बी.एस.स्टॅण्ड येथे सायं. ०४.१५ वा.वडीलांचा अपघात झाला आहे व सी.पी.आर.हॉस्पीटल येथे ये’. ते सी.पी.आर. येथे अपघात विभागात गेले असता तेथील डॉक्टरांनी सांगितले त्यांच्या वडीलांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. अपघाताच्या चौकशीमध्ये समजले की, ‘नित्यानंद हॉटेल येथे एस.टी. बसमुळे वडीलांचा अपघात झाला आहे’. एस.टी.चे

चालकाच्या बाजुचे चाक त्यांच्या वडीलांच्या डाव्या पायावरुन गेल्यामुळे त्यांचा मृत्यु झाला. सदर एस.टी.चे चालक प्रकाश लोहार होते. आरोपीला त्यांनी पाहिले नव्हते. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता.

**०८.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यांनी त्यांच्या उलट - तपासामध्ये मान्य केले आहे की, घटनेदिवशी त्यांची व त्यांच्या आईची भेट सी.पी. आर.येथे झाली. फिर्याद देताना आईबरोबर ते पोलीस ठाण्यात गेले होते. त्यांचा जबाब पोलीसांनी दुस-या दिवशी घेतला. फिर्याद देतेवेळी पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला नाही. अपघातस्थळ येथे दोन रस्ते म्हणजे पुतळयाकडे येणारा रस्ता मिळतो. सदर दोन्ही रस्त्यावंर वाहनांची नेहमी वर्दळ असते. एस.टी.स्टॅण्डला जाण्यासाठी मधल्या चौकामधुन यु-टर्न घेऊन जावे लागते. दोन्ही रस्त्यावंर दुकाने आहेत. आरोपीचे नाव त्यांना पोलीसांकडुन समजले. त्यांनी अपघात नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा दाखल केलेला आहे. एस.टी.स्टॅण्डकडून त्यांच्या घरी येण्यासाठी रस्ता ओलांडून विरुध्द बाजुस यावे लागते. घटनेदिवशी त्यांचे वडील सायकलवरुन गेले होते. वडील सायकलवरुन जात असताना त्यांनी एस.टी.ची धडक झाली असे समजले. त्यांच्या वडीलांच्या सायकलचे नुकसान झाले आहे.

**०९.** न्यायालयीन पटलावर आलेल्या पुराव्याच्या आधारे आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. तसेच सदर दोन्ही साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाला पुरक ठरत नाही. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. साक्षीदार क्र.०१ यांनी अपघात प्रत्यक्ष पाहिलेला नाही असे कथन केले आहे तसेच साक्षीदार क्र.०१ व ०२ यांनी केवळ नुकसानभरपाई मिळण्याकरीता फिर्याद दाखल केल्याचे मान्य केले आहे. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊन देखील सदर कामी कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच स्वतंत्र पंच साक्षीदार तपासलेले नाहीत. त्यामुळे आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी.बस क्र.एम.एच.०६

एस.८९१६ ही हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवली व शकील बकश मुजावर यांना धडक देऊन ते एस.टी.बसच्या चालकाच्या पाठीमागील चाकाच्या खाली सापडल्यामुळे त्यांच्या डाव्या पायास गंभीर दुखापत होऊन त्यांना उपचारासाठी दाखल केले असता ते मयत झाले ही बाब सिध्द झालेली नाही न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपीपक्षास जातो. सदर कामी आलेला पुरावा हा संशयी स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा आरोपी पक्षास देणे न्यायोचित वाटत आहे. म्हणुन मुद्दा क्र.०१ ते ०५ चे निष्कर्ष नकारार्थी देत असुन मुद्दा क्र.०६ चे निष्कर्षाप्रत पुढील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

**०१.** आरोपी प्रकाश रंगराव लोहार यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**०२.** आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो व आरोपीला मुक्त करण्यात येते.

**०३.** आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे रक्कम रू.१५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

*(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.05 13:44:03 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.०५/०५/२०२६.